# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 18.03.2026** **वार- बुधवार**

---

**बारणे**

देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डातील समस्या सोडवण्यासाठी निधी देण्याची मागणी खासदार श्रीरंग बारणे यांनी संरक्षण विभागाकडे केली आहे. पिंपरी-मावळ लोकसभा मतदारसंघातील देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या हद्दीतील विविध विकास कामं निधीअभावी रखडली आहेत. पिण्याचं पाणी, रस्ते, स्वच्छतेचा अभाव आहे. असुविधांनी नागरिक त्रस्त आहेत. त्यासाठी कॅन्टोन्मेंट बोर्डाला निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी बारणे यांनी दिल्लीत संरक्षण विभागाच्या महानिदेशक शोभा गुप्ता यांच्याकडे निवेदनाद्वारे प्रत्यक्ष भेटीमध्ये केली आहे.

**आयुष**

सद्यस्थितीतील आरोग्य सेवेची गरज ओळखून केंद्राप्रमाणं महाराष्ट्रातही स्वतंत्र 'आयुष' मंत्रालयाची स्थापना करावी, अशी मागणी आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी आज विधानसभेत बोलताना केली. आयुर्वेद,योग,युनानी,सिद्ध आणि होमिओपॅथी या उपचार पद्धतीत आजार होऊच नयेत यासाठी प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा देतात. या सर्व पद्धती एकत्र असण्याकरता राज्यात 'आयुष' मंत्रालयाची स्वतंत्रपणे स्थापना करणं आवश्यक असल्याचं मत आमदार शिरोळे यांनी व्यक्त केलं.

**रोजगार**

पुणे जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार मुली आणि महिलांना खाजगी क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशानं जिल्हा कौशल्य विकास रोजगार आणि उद्योजकता मार्गदर्शन केंद्र पुणे आणि यशस्वी अकॅडमी फॉर स्किल्स यांच्याद्वारे चिंचवड इथं आज जागतिक महिला दिनानिमित्त पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा संपन्न झाला. या मेळाव्यात 53 महिला उमेदवारांनी सहभाग नोंदवला आणि ट्रेनी ऑपरेटर, क्षेत्र अधिकारी अशा विविध पदांसाठी मुलाखती दिल्या.यावेळी मार्गदर्शन करताना कौशल्य विकास विभागाचे पदाधिकारी सुनील नाळे यांनी रोजगार डॉट महास्वयं डॉट जी ओ व्ही डॉट इन या संकेतस्थळावर किंवा 020-26-13-36-06 या दूरध्वनी क्रमांकावर रोजगार संधीसाठी मुली आणि महिला उमेदवारांनी मोफत नाव नोंदणी करावी असं आवाहन केलं. या संकेतस्थळामार्फत अठराहजारपेक्षा जास्त नामांकित औद्योगिक कंपन्यांमधील रोजगार संधी गरजू उमेदवारांसाठी उपलब्ध आहेत असंही त्यांनी सांगितलं.

**शिक्षक**

तंत्रज्ञानाचा वापर करून शिक्षणाचं कार्य करणाऱ्या राज्यातील 332 शिक्षकांची आयडॉल शिक्षक म्हणून निवड करण्यात आली आहे. संबंधित शिक्षकांच्या अनुभवाचा आणि कौशल्याचा उपयोग संपूर्ण शिक्षण विभागासाठी करण्यात येणार असल्याचं राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद अर्थात विद्या प्राधिकरणाचे संचालक डॉक्टर हेमंत वसेकर यांनी सांगितलं. आयडॉल शिक्षकांचा विविध समितीच्या बैठकांमध्ये सन्मान करणं आणि त्यांच्या कार्याचा लेखा-जोखा ठेवण्यासह तालुका, जिल्हा, विभागस्तरावरील विद्यार्थी गुणवत्तेच्या विविध समित्यांमध्ये त्यांच्या कामाचा उपयोग करण्यासाठी चर्चा करावी असंही डॉक्टर वसेकर यांनी सुचवलं.

**जगदाळे**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेले संतोष जगदाळे यांची कन्या आसावरी जगदाळे यांना आज पुणे महापालिकेत नोकरीचं नियुक्तीपत्र देण्यात आलं. यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आसावरी जगदाळे यांना भ्रमणध्वनीवर संपर्क साधून त्यांचं अभिनंदन केलं.

**अभिवादन**

स्वराज्य रक्षक धर्मवीर श्री संभाजी महाराज यांच्या बलिदान स्मरणदिनानिमित्त उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांनी आज श्री क्षेत्र वढू बुद्रुक इथल्या छत्रपती संभाजी महाराजांच्या समाधीस्थळी जावून दर्शन घेतलं. तसंच श्री क्षेत्र तुळापूर इथल्या बलिदानस्थळी जावून अभिवादन केलं.

**जिप**

पुणे जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदी दौंड तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे विरधवल जगदाळे पाटील यांची तर उपाध्यक्षपदी आंबेगाव तालुक्यातील विवेक वळसे पाटील यांची नुकतीच बिनविरोध निवड झाली आहे. या निवडीनंतर कार्यकर्त्यांनी आनंद साजरा केला.

**शहनाई**

शहनाईतून उमटलेला मारुबिहाग, मधुवंती, बनारसी दादरा आणि भक्तिगीतांच्या स्वरवर्षावाची पुणेकर रसिकांना अनोखी अनुभूती मिळाली. सनई सम्राट पंडित शंकररावजी, सूरमणी पंडित प्रभाशंकरजी गायकवाड शहनाई-सुंद्री अकादमी आणि गुरुकुल, पुणे याच्या शिष्यांकडून आयोजित शहनाई-सुंद्री महोत्सवाच्या निमित्तानं रसिकांना ही पर्वणी मिळाली. आधुनिक संगीताच्या प्रवाहात शहनाई आणि सुंद्री या पारंपरिक वाद्यांची जपणूक करत त्यांचा प्रचार आणि प्रसार व्हावा, बैठकीचं वाद्य म्हणून या वाद्यांची ओळख निर्माण व्हावी या हेतूनं महोत्सवाचं प्रथमच आयोजन करण्यात आल्याचं ज्येष्ठ शहनाईवादक डॉक्टर प्रमोद गायकवाड यांनी याप्रसंगी सांगितलं.

**टँकर**

उन्हाळा सुरू झाल्यानं पाणी टंचाईमुळं गेल्या फेब्रुवारी महिन्यात पुण्यातील विविध भागांमध्ये ४६ हजार ६८ टँकरच्या फेऱ्या झाल्या आहेत. टँकर भरण्यासाठी महापालिकेनं सात ठिकाणी व्यवस्था केली आहे. उन्हाचा तडाखा वाढू लागल्यानं आतापासूनच टँकरची मागणी वाढण्यास सुरुवात झाली आहे. धनकवडी, कात्रज, कोंढवा, येवलेवाडी, किरकिटवाडी, वडगाव बुद्रुक, धायरी, वाघोली, धानोरी, लोहगाव, सूस, पाषाण या भागातून टँकरची मागणी वाढण्यास सुरुवात झाली आहे.

**कुस्ती**

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघटनेच्या वतीनं 68 वी महाराष्ट्र केसरी आणि वरिष्ठ गट राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा आजपासून वाघोली इथं सुरू होत आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते या स्पर्धेचं उद्घाटन होत आहे. चार आखाड्यांमध्ये होणाऱ्या या स्पर्धेत 15 नवोदित कुस्तीपटूनाही संधी देण्यात येणार आहे. 22 मार्चपर्यंत चालणाऱ्या या स्पर्धेत 42 संघांचे 850 मल्ल मैदानात उतरतील.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज आकाश गडद झाले असून पावसाळी वातावरण तयार झाले आहे. आज दुपारपासून आकाश ढगाळ झाल्यामुळं कमाल तापमानात मोठी घट झाली.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत, उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**